**स.के.नं. ३०३/२०१३**
**नि.क्र.३०/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र.२** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | प्रफुल्ल शंकर म्हात्रे, |
| वय | - | ६५ वर्षे |
| व्यवसाय | - | काहीनाही |
| राहणार | - | देऊळवाडी, उरण, ता. उरण, जि. रायगड. |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता पी. बी. देशमाने यांच्याद्वारे</u>**

१. दिनांक २६.०५.२०१३ रोजी मला पोलीस अधिकारी श्री. पाटील यांनी चाणजे या गावात पंचनामाकामी बोलवले होते. त्यावेळी आमच्यासोबत दुसरा पंच दिपक कोळी हा होता. तेथे पोलीसांनी आम्हा पंचांसमक्ष पंचनामा केला होता. तेथे एक दगड मिळुन आला होता. तो पंचनामा रात्री ०९.३० वाजता सुरू करून १०.१५ वाजता संपला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला, त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे. करीता सदर पंचनाम्याला **निशाणी क्र.P4 PW2** देण्यात येत आहे. मी आरोपींना ओळखत नाही. मी त्यांना पाहिल्यास ओळखु शकतो. आजरोजी एक आरोपी न्यायालयात हजर आहेत.

२. त्यानंतर दिनांक २९.०५.२०१३ रोजी मला पोलीसांनी पुन्हा बोलावले होते. त्यावेळी अनिश कोळी हा दुसरा पंच होता. त्यादिवशी मला पोलीस अधिकारी श्री.भाविकट्टे यांनी उरण पोलीस ठाण्यात बोलावले होते. तेथे त्यांनी मला एक सीडी व तीन फोटो दाखवले होते. आता मला ती सीडी दाखवली. माझेसमक्ष जप्त केलेली सीडी तीच आहे. करीता सदर सीडीला **भौतिक वस्तु क्र. ब** देण्यात येतो. आता मला माझेसमक्ष जप्त केलेले फोटो दाखवले. ते तीन फोटो आहेत. करीता सदर फोटोंना

एकत्रितपणे **भौतिक वस्तु क्र. क** देण्यात येतो. आता मला भौतिक वस्तु क्र. अ वरील दगड दाखवला. माझेसमक्ष जप्त केलेला दगड हाच आहे. तो पंचनामा दुपारी ०३.३० वाजता सुरू करून ०४.०० वाजता संपला होता. आता मला जप्ती पंचनामा दाखवला, त्यावर अनुक्रमांक २ वर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे. करीता सदर पंचनाम्याला **निशाणी क्र.P5 PW2** देण्यात येत आहे.

<u>**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. मोमीन यांच्याद्वारे...**</u>

३. देऊळवाडी पासुन चाणजे गाव किती किलोमीटर अंतरावर आहे ते मला सांगता येत नाही. पाटील पोलीस अधिकारी यांनी मला माझे घरच्या क्रमांकावर फोन केला होता, तो क्रमांक मला आठवत नाही. त्यांचेकडे माझा फोन क्रमांक होता. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रत्येक प्रकरणात पंच म्हणुन साक्ष देतो. मी त्यादिवशी पोलीस ठाण्यात कामानिमित्त गेल्याने मला त्यांनी बोलावले होते. मी देऊळवाडी पासुन चाणजे गावात रिक्षाने गेलो होतो. मी तेथे फिर्यादी मोकल यांचे घराजवळ उतरलो. हे म्हणणे खरे नाही की, मी रस्त्यापासुन ५० फुट पायी चालत गेलो. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीच्या घरी चहा घेतला. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीच्या घरामागे तेथुन गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तेथुन मी ५० फुट पायी सरळ चालत गेलो. मी पंचनाम्यातील मजकुर वाचून सही केली होती. पंचनाम्यात ५० फुट पायी चालत गेल्याचा मजकुर चुकीचा लिहिला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ८३ फुट चालत गेल्यानंतर पपईचे झाड होते. हे म्हणणे खरे आहे की, तेथे बरेचशे दगड होते. भौतिक वस्तु क्र. अ वरील दगड पाटील साहेबांनी तेथुन माझेसमक्ष उचलला होता. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मला न्यायालयात दाखवलेले फोटो पुसट झालेले असून त्यावेळी ते फोटो चांगले होते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा रात्रीच्या वेळी केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे लाईट नव्हते. ते लाईट

रस्त्यावरील होते. मला भावीकट्टी साहेबांनी मी तहसिलमध्ये गेलो असताना तेथुन बोलवले होते. मी तहसिलमध्ये दुपारच्या वेळेत गेलो होतो. तेथे भाविकट्टी साहेबांनी ३ फोटो व १ सीडी दाखवली. तेथे दुसरा पंच तसेच फिर्यादी रूपाली हजर होते. त्यावेळी तेथे पाटील साहेब हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर न जाता पोलीसांनी माझ्या घटनास्थळा पंचनाम्यावर सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे आहे की, माझेविरूद्ध न्यायालयात कोणतेही प्रकरण नाही किंवा मी कोणाविरूद्धही प्रकरण दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, ॲड. मोकल हे चाणजे येथे राहण्यापुर्वी देऊळवाडी येथे माझे शेजारी राहात होते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटा पुरावा दिला आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**सही/-**

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – २५/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण**